नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/01/2024 (बुधवार) दुपार

# अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन मौदा ची कारवाई

दिनांक १५/०१/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील पोलीस पथक पोस्टे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे मौदा हद्दीतील १४ किमी अंतरावर मौजा किरणापुर घाट येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची विना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोस्टे मौदा येथील पथकाने नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— देवानंद पंढरी वढवे, रा. नान्हादेवी ता. मौदा, जि. नागपुर** हा किरनापुर घाट नदीच्या पात्रातील रेती अवैधरित्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आला सदर आरोपी वाहतुक करीत असलेल्या विना नंबरची ट्रॅक्टर ट्रॉली त्याची किंमत ५,५०,०००/—रू. ट्राली किंमती १,००,०००/— रू. एक ब्रास रेती किंमती ३,०००/—रू. असा एकुण ६,२३,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— रोशन सुरेश पाटील, पोलीस ठाणे मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक निशा भते मॅडम यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक निशा भते मॅडम या करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर